
रोझा पार्क्स

लेखक - डेविड अॅडलर
चित्र: रॉबर्ट कॅसिला
मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक




रोझा पार्क्स

लेखक - डेविड अॅडलर
चित्र: रॉबर्ट कॅसिला
मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक





रोझा पार्क्सचा जन्म ४ फेब्रुवारी, १९१३ ला अमेरिकेमध्ये टस्कजी, अलाबामा इथे झाला. तिची आई लियोना एडवर्ड्स मॅकोल्ली एका शाळेत शिक्षिका होती. रोझाचे वडील जेम्स मॅकोल्ली सुतारकाम आणि गवंडीकाम करायचे. रोझाचे पूर्वज गुलाम होते.




रोझाच्या जन्मानंतर तिचे कुटुंब पाइन-लेवल, अलाबामाला आजी-आजोबांच्या छोट्या शेतीवर राहायला गेले. शेतात गाई-गुरे, कोंबड्या आणि फळांची भरपूर झाडे होती.

रोझा दोन वर्षांची असताना १९१५ मध्ये तिच्या धाकट्या भावाचा सिल्वेस्टरचा जन्म झाला. त्यानंतर लगेचच रोझाचे बाबा कामाच्या शोधात घर सोडून गेले. त्यामुळे बाबांचा सहवास तिला खूप कमी मिळाला.

थोडी मोठी झाल्यावर रोझा आपल्या आजी-आजोबांच्या तसेच जवळपासच्या कापसाच्या शेतांमध्ये काम करू लागली. वसंतामध्ये ती कापसाच्या शेतातले तण काढायचे काम करायची आणि पानगळ सुरु झाली की ती कापूस वेचायची.




फक्त गोऱ्या लोकांसाठी



रोझाच्या लहानपणी आफ्रिकन-अमेरिकन लोकांचा वर्णद्वेष केला जाई. “जिम क्रो” कायद्याने काळ्या आणि गोऱ्या लोकांमधली दरी अजूनच वाढवली होती. बस, ट्रेन, बागा, सार्वजनिक पाणवठे, चर्च, खानावळी, उपहारगृहे, सिनेमागृहे अशा सगळ्या सार्वजनिक ठिकाणी काळ्या लोकांसाठी वेगळे नियम होते. अमेरिकेच्या सैन्य विभागामध्ये सुद्धा वर्णभेद तीव्र होता.



काळ्यांसाठी



रोझा पाइन-लेवलला राहत असताना काळ्यांचा द्वेष करणाऱ्या गोऱ्या लोकांची **कू-क्लक्स-क्लान** नावाची एक अतिरेकी संघटना खूपच सक्रिय होती. संघटनेचे लोक पांढरे कपडे घालायचे आणि चेहरा पांढऱ्या कापडाने झाकायचे. दक्षिणेकडील तसेच अमेरिकेच्या इतर शहरांमध्ये क्लानचे अतिरेकी आफ्रिकन अमेरिकन, रोमन कॅथेलिक, ज्यू तसेच गैर अमेरिकन लोकांचा द्वेष करणाऱ्या राजकीय उमेदवाराला निवडून आणण्यासाठी लागेल ती मदत करीत. त्यांनी अनेक काळ्या लोकांना मारझोड केली, त्यांचा अमानुष छळ केला, अनेकांना जिवंत जाळले. रोझाचे आजोबा क्लानच्या अतिरेक्यांपासून आपले कुटुंब सुरक्षित राहावे म्हणून सतत बंदूक जवळ बाळगत.








रोझा लहान असताना आईने तिला वाचायला शिकवले. सहा वर्षांची झाल्यावर रोझा आफ्रिकन अमेरिकन मुलांसाठीच्या शाळेत पहिल्या इयत्तेत जाऊ लागली. तिची शाळा म्हणजे एका खोलीची जुनाट जागा होती. ही शाळा पाचच महिने उघडी असायची. गोऱ्या मुलांची पक्क्या इमारतीत असलेली शाळा मात्र नऊ महिने चालायची.

पाईन लेवल मधील ही काळ्या मुलांसाठीची शाळा फक्त सहावीपर्यंतच होती. त्यामुळे पुढचे शिक्षण घ्यायला रोझा १९२४ मध्ये अलाबामामधील माँटगोमरी शहरात गेली. घरातील लोकांच्या आजारपणामुळे तिला १९२९ मध्ये शाळा सोडावी लागली. आजारी आजी आणि आईची सेवा करायला ती घरी परत आली. नंतर १९३३ मध्ये तिने आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.

१९३१ मध्ये रोझाची रेमंड पार्क्सशी ओळख झाली. रेमंड व्यवसायाने न्हावी होता. आफ्रिकन अमेरिकन लोकांच्या हक्कांसाठी चालू असलेल्या चळवळीत तो सक्रीय होता. काळ्या लोकांसाठी रेमंड लढतोय ह्याचा रोझाला खूप अभिमान होता. डिसेंबर १९३२ मध्ये पाइन-लेवलला रोझाच्या आईच्या घरी रोझा आणि रेमंडचे लग्न झाले.




१९४० सालच्या सुरुवातीला रोझा NAACP (नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल) संस्थेची सदस्य झाली. ही संघटना काळ्या लोकांना दिली जाणारी अयोग्य वागणूक बंद व्हावी ह्यासाठी काम करीत होती. रेमंड ह्या संघटनेचा खूप आधीपासूनच सदस्य होता. NAACP ची सदस्य झाल्यावर लगेचच रोझाची संस्थेच्या मॉंटगोमरी शाखेची सेक्रेटरी म्हणून निवड झाली.



माँटगोमरीमध्ये सार्वजनिक बसमुळे वर्णभेद रोजच ठळक दिसायचा. आफ्रिकन अमेरिकन लोकांना बसमध्ये फक्त मागच्या बाकांवर बसण्याची परवानगी होती. कधी बसमध्ये ते तिकीट काढून पुढच्या दारातून चढले तर त्यांना मागच्या दाराने चढा असे सांगून खाली उतरवले जाई. काहीवेळा तर ते मागच्या दाराने चढायच्या आतच ड्रायव्हर जोरात बस पळवायचा.


१९४३ सालची गोष्ट. बसमध्ये खूप गर्दी होती म्हणून रोझा पुढच्या दाराने चढली आणि तिने तिकीट घेतले. बस ड्रायवर जेम्स ब्लेकने तिला खाली उतर आणि मागच्या दाराने चढ असे सांगितले. आता चढलेच आहे तर कशाला उतरा आणि असेही गर्दीमुळे मागच्या दारातून चढणे शक्य नव्हते म्हणून तिने नकार दिला. पण तरीही त्याने तिला खाली उतरायला भाग पाडले. त्या बसमध्ये चढणे शक्य नव्हते म्हणून रोझा पुढच्या बसची वाट पाहत उभी राहिली.





त्यानंतर १२ वर्षांनी १ डिसेंबर १९५५ ला तिची जेम्स ब्लेकशी पुन्हा गाठ पडली. मॉंटगोमरी डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये ती नोकरी करीत होती. त्यादिवशी कामावरून घरी परतताना तिने क्लेव्हलंड ॲव्हेनूची बस पकडली आणि मधल्या भागातल्या सीटवर बसली. त्यावेळी काळ्यांना बसच्या मागच्या भागात आणि गोरे उभ्याने प्रवास करीत नसतील तर मधल्या भागातही बसायला परवानगी होती.

पुढच्या थांब्यावर काही गोरे प्रवासी बसमध्ये चढले. पुढे गर्दी होती म्हणून ते रोझा बसली होती त्या भागात आले. ड्रायव्हरने त्या रांगेतल्या चार काळ्या लोकांना उठायला सांगितले. तिघेजण लगेचच उठले पण रोझाने मात्र उठण्यास नकार दिला. तिने गोऱ्या प्रवाश्याइतकेच भाडे दिले होते. मॉंटगोमरीमधील कायद्यानुसार आपल्याला उठायला हवे हे तिला माहीत होते पण हा कायदा चुकीचा व अन्यायकारक आहे हे तिला कळत होते. जेम्स ब्लेकने पोलिसांना बोलावले. त्यांनी रोझाला अटक केले.





सोमवारी ५ डिसेंबरला रोझाला स्थानिक न्यायालयात आणले. वर्णभेदाचा नियम मोडला म्हणून तिला दोषी ठरवण्यात आले. तिला दहा डॉलर अधिक खटल्याचा खर्च असा दंड ठोठावला. ह्याविरुद्ध रोझा आणि तिचे वकील उच्च न्यायालयात गेले.

रोझाच्या अटकेच्या निषेधार्थ ५ डिसेंबरपासून माँटगोमरीमधील काळ्या लोकांनी सार्वजनिक बसवर बहिष्कार घालायचे असे ठरवले. कामावर जाण्यासाठी त्यांनी इतर मार्गांचा वापर सुरु केला. बरेच जण कितीही लांबचे अंतर असले तरी चालत जायचे.



डॉ. मार्टिन ल्युथर किंग ज्युनिअर यांनी ह्या बसवरील बहिष्काराचे नेतृत्व केले. ते डेक्स्टर अवेन्यू बाप्टिस्ट चर्चचे नवीन पदाधिकारी होते.


५ डिसेंबरच्या संध्याकाळी त्यांनी मोठ्या जनसमुदायासमोर ह्या बहिष्कारामागची आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, “आता वेळ आली आहे. आमच्यावर वर्षानुवर्षे केलेल्या अन्यायाने आम्ही पिचून गेलो आहोत. खूप काळ वेगळेपणाची अपमानास्पद वागवणूक आणि अमानुष अत्याचार सोसून आम्ही आता पार थकून गेलो आहोत.”



सार्वजनिक बसवरील बहिष्कार एका वर्षापेक्षा जास्त काळ चालू राहिला. ह्या काळात एकाही आफ्रिकन अमेरिकन माणसाने मॉंटगोमरी, अलाबामा येथे सार्वजनिक बसमधून प्रवास केला नाही.


रोझा पार्क्स, डॉ. किंग तसेच अनेक लोकांना तुरुंगात टाकण्यात आले. बहिष्काराची भूमिका घेतलेल्या नेत्यांच्या घरांवर हल्ले झाले.

१३ नोव्हेंबर १९५६ मध्ये अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने सार्वजनिक बससाठीचा वर्णभेदाचा कायदा रद्द केला. २१ डिसेंबरमध्ये मॉंटगोमरीमध्ये कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी सुरु झाली तेव्हाच हा बहिष्कार मागे घेण्यात आला. पत्रकारांनी रोझाची मुलाखत घेतली आणि बसमध्ये पुन्हा बसलेल्या रोझाचे फोटो झळकले.










अनेक लोकांच्या मते रोझाच्या अटकेनंतरच अमेरिकेमध्ये वर्णभेदाविरुद्धची समानतेसाठी नागरी हक्कांची चळवळ खऱ्या अर्थाने सुरु झाली. काही लोकांच्या मते ही चळवळ त्याच्या वर्षभर आधी सुरु झाली. १९५४ च्या मे महिन्यामध्ये सुप्रीम कोर्टाने अजून एक महत्वपूर्ण निर्णय देऊन काळ्या आणि गोऱ्या मुलांसाठीच्या वेगळ्या शाळा बेकायदेशीर ठरवल्या.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर सार्वजनिक बस आणि शाळांमध्ये वर्णभेद संपुष्टात आला पण अजूनही काळ्यांना वेगळी वागणूक दिली जातच होती. समान नागरी हक्क मिळावे म्हणून रोझाची लढाई सुरुच राहिली.





रोझाला धमक्यांचे अनेक फोन येत. घरातील लोकांना तिच्या सुरक्षिततेची खूप काळजी वाटायची. अखेर १९५७ मध्ये रोझा, रेमंड आणि तिची आई माँटगोमरी सोडून डेट्रॉइट, मिशिगन इथे राहायला आले. डेट्रॉइटला रोझाचा भाऊ सिल्वेस्टर राहत होता.

१९६५ मध्ये रोझाने डेट्रॉइटला अमेरिकन कॉंग्रेसचे प्रतिनिधी, जॉन कोन्येर्स ह्यांच्याबरोबर काम सुरु केले. ह्या काळामध्ये रोझाने खूप चांगली कामे केली. तिने अनेक गरीब लोकांना घरेही मिळवून दिली. १९८८ मध्ये रोझा निवृत्त झाली.

१९७० चे दशक रोझासाठी खूप वाईट गेले. १९७७ मध्ये तिच्या पतीचे, रेमंडचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यानंतर काही महिन्यानी तिचा भाऊ सिल्वेस्टर मृत्यू पावला. आणि १९७९ मध्ये रोझाची आईही देवाघरी गेली.


१९८७ मध्ये रोझाने युवकांसाठी “रोझा ॲण्ड रेमंड पार्क्स इन्स्टिटट्यूट फॉर सेल्फ-डेवलपमेंट” ही संस्था स्थापन केली. ही संस्था युवकांना उभारी देण्याचे तसेच त्यांनी आपले शिक्षण पूर्ण करावे ह्यासाठी मदत करत होती.

रोझा पार्क्सला “नागरी हक्क आंदोलनाची जननी” म्हणून संबोधले जाते. चळवळीमुळे अमेरिकेत अनेक महत्वाच्या आणि आवश्यक सुधारणा झाल्या. कामाच्या ठिकाणी तसेच उपहारगृहे, बस किंवा इतर कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी रंग, वंश, धर्म, राष्ट्रीयत्व ह्यावर आधारित भेदाभेद करणाऱ्या लोकांविरुद्ध कडक कायदे नेमले गेले. प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाला.

रोझा पार्क्सला स्पिनगार्न मेडल, मार्टिन ल्युथर किंग अहिंसा शांती पुरस्कार, एलेनॉर रूझवेल्ट वुमन ऑफ करेज अवार्ड, आणि प्रेसिडेंट मेडल फॉर फ्रीडम अवार्ड असे अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. माँटगोमरीमधील क्लेवलंड ॲव्हेन्यूचे नाव बदलून रोझा पार्क्स बोलवार्ड ठेवण्यात आले.



आता सर्व वंश, रंगाचे लोक एका बाकावर बसून प्रवास करीत होते. सरकारी शाळांमध्ये सर्व मुले एकत्र शिकत होती. सर्व ठिकाणी लोकांना समानतेने आणि आदराने वागवले जात होते. हे सगळे पाहताना रोझाला वाटले की आपल्यासाठी हाच सर्वात मोठा पुरस्कार आहे.



लेखकाची टीप

रोझा पार्क्सचा जन्म टस्कजी, अलाबामा इथे झाला. टस्कजी इन्स्टिट्यूटचे हे माहेरघर आता टस्कजी यूनिवर्सिटी म्हणून ओळखले जाते. ह्याची स्थापना १८८१ मध्ये बुकर टी. वाशिंगटननी (१८५६-१९१५) आफ्रिकन अमेरिकन तरुणांसाठी केली. इथे युवकांनी जीवन कौशल्ये आत्मसात करून एक चांगले आयुष्य जगावे ह्या उद्देश्याने ही संस्था चालू केली.

ज्या क्रांतिकारी काळ्या वकीलाने रंग, वर्ण असे भेद मिटवून सर्व मुलांसाठी एकच शाळा करण्यासाठी लढा दिला आणि १९५४ मध्ये सुप्रीम कोर्टाला वर्णभेदाचा कायदा रद्द करायला लावला त्यांचे नाव आहे थुरगुड मार्शल. थुरगुड मार्शल ह्यांची १९६७ मध्ये अमेरिकेतील सुप्रीम कोर्टामध्ये न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. अशी संधी मिळालेली ते पहिले आफ्रिकन अमेरिकन ठरले.

महत्वपूर्ण घटनाक्रम

१९१३	टस्कजी, अलाबामा मध्ये ४ फेब्रुवारीला जन्म
१९३२	रेमंड पार्क्सबरोबर विवाह
१९४३	माँटगोमरी मध्ये NAACP ची सचिव म्हणून नियुक्ती
१९५४	१७ मेला सुप्रीम कोर्टाने रंगभेद करणाऱ्या शाळांना बेकायदा आणि असंमत ठरवले
१९५५	1 डिसेंबरला बसमध्ये मागे जाण्यास नकार दिल्याने अटक
१९५५	५ डिसेंबरपासून माँटगोमरीमध्ये सार्वजनिक बसमधून प्रवास करण्यावर बहिष्कार
१९५६	१३ नोव्हेंबरला सुप्रीम कोर्टाचा "रंगभेद" समाप्तीचा आदेश. बसमध्ये लोकांना कुठेही बसण्याचे स्वातंत्र्य
१९५६	२१ डिसेंबर १९५६ ला बसवरील बहिष्कार मागे
१९६५	कांग्रेस सदस्य जॉन कोन्येर्ससोबत काम सुरु
१९८७	"रोझा अॅण्ड रेमंड पार्क्स इन्स्टिट्यूट फॉर सेल्फ-डेव्हलपमेंट" **ची** स्थापना "मेडल ऑफ फ्रीडम" पुरुस्काराने सन्मानित
२००५	२४ ऑक्टोबरला डेट्रॉइट, मिशिगन येथे निधन

